# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९,२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०२१-२२/डीबीटी/ 4308 दि.२७.०४.२०२२
ईमेलद्वारा तात्काळ 27 APR 2022

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- महाविद्यालय तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत.**

संदर्भ :- १.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/१४५२०, दि. १८.१२.२०२१
२.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/१४७३८, दि. २४.१२.२०२१
३.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/१४७३८, दि. २४.१२.२०२१
४.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/८३४, दि. १८.०१.२०२२

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांची शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन तात्काळ पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि दि. २७.०४.२०२२ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०१८-१९, सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मधील खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहेत.

| अ. क्र. | विभागाचे नांव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| १ | अमरावती | 201 | 174 | 988 | 11 | 11 | 430 | 437 | 228 | 280 |
| २ | औरंगाबाद | 432 | 407 | 3566 | 1 | 12 | 3857 | 1414 | 652 | 1431 |
| ३ | जळगांव | 440 | 102 | 824 | 0 | 1 | 209 | 171 | 88 | 199 |
| ४ | कोल्हापूर | 63 | 120 | 2324 | 0 | 7 | 2771 | 799 | 425 | 702 |
| ५ | मुंबई | 64 | 142 | 411 | 1 | 4 | 271 | 74 | 99 | 174 |
| ६ | नागपूर | 157 | 94 | 924 | 0 | 3 | 121 | 132 | 29 | 93 |
| ७ | नांदेड | 272 | 184 | 3010 | 5 | 4 | 1182 | 691 | 425 | 1051 |
| ८ | पनवेल | 49 | 133 | 1085 | 0 | 3 | 861 | 90 | 63 | 151 |
| ९ | पुणे | 190 | 204 | 2982 | 3 | 61 | 3476 | 515 | 405 | 879 |
| १० | सोलापूर | 76 | 22 | 455 | 0 | 1 | 665 | 65 | 66 | 92 |
| | एकूण | 1944 | 1582 | 16569 | 21 | 107 | 13843 | 4388 | 2480 | 5052 |

Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय व विभागाच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच पडताळणी करीता प्रलंबित राहिलेल्या अर्जांबावत भविष्यामध्ये उद्‌भवणाऱ्या प्रश्नास संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

(प्रमिला मराठे)
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.

प्रत :- माहिती व कार्यवाहीस्तव

१. मा. कुलसचिव, सर्व अकृपि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner